# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 13.03.2025** **वार-गुरुवार**

---

**<u>होळी</u>**

फाल्गुन पौर्णिमा अर्थात हुताशनी म्हणजेच होळी पौर्णिमा आज सर्वत्र साजरी केली जात आहे. आज संध्याकाळी ठिकठिकाणी होलिका दहन केलं जाईल. होलिका मातेला पुरणपोळीचा नैवेद्य दाखवून अनिष्टाचा नाश करण्याची प्रार्थना  होलिका दहनाच्या वेळी करण्याचा प्रघात आहे.

**<u>होळी</u>**

दरम्यान होळीसाठी झाडं तोडल्यास १ लाख रुपयांचा दंड आकारण्याचा निर्णय पुणे महापालिकेनं घेतला आहे. त्या अनुषंगानं पुणे शहरातील वन विभागाच्या हद्दीत असलेल्या झाडं तोडीवर प्रशासन करडी नजर ठेवत आहे.

**<u>रेल्वे</u>**

उद्या सर्वत्र धूळवड साजरी केली जाणार आहे. धुलीवंदनानिमित्त लोहमार्ग पोलिसांकडून बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. धावत्या रेल्वे गाड्यांवर रंगाने भरलेले फुगे फेकल्यास कारवाई करण्याचा इशारा लोहमार्ग पोलिसांनी दिला आहे.

## रंगयात्रा

पुणे महापालिकेच्या अमृत महोत्सवानिमित्त सांस्कृतिक केंद्र विभागाच्या वतीनं नाट्यगृह आणि सांस्कृतिक केंद्रांमधील ऑनलाइन बुकिंगसाठी 'रंगयात्रा हे मोबाइल अॅप्लिकेशन तयार करण्यात आलं आहे. त्यामुळे सर्व नाट्यगृहाचे ऑनलाइन बुकिंग, उपलब्ध तारखा, आसन क्षमता यांची माहिती एका क्लिकवर उपलब्ध होणार आहे.

## कवी संमेलन

पुणेकरांनी आजपर्यंत मला भरभरून प्रेम दिले आहे, त्यांचे हे प्रेम मी कधीही विसरू शकणार नाही. अशी भावना ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ यांनी आज पुण्यात व्यक्त केली. प्रकाश ढेरे चॅरिटेबल ट्रस्ट आणि गंगालॉज मित्र मंडळातर्फे यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त यशवंतराव चव्हाण कला आणि साहित्य पुरस्कार समारंभात प्रकाश ढेरे स्मृतिप्रित्यर्थ ‘कला जीवनगौरव पुरस्कार’ अशोक सराफ यांना ज्येष्ठ अभिनेते डॉ. मोहन आगाशे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. प्रसिद्ध दिग्दर्शक, अभिनेते नागराज मंजुळे या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

## दूध दर वाढ

गाय आणि म्हशीच्या दूध दरात प्रतिलिटर दोन रुपयांनी वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. आज दूध उत्पादक आणि प्रक्रिया कल्याणकारी संघाच्या सभासदांची बैठक पुणे जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ मर्यादित, कात्रज डेअरीमध्ये घेण्यात आली. त्यामध्ये हा निर्णय एकमताने घेण्यात आला. राज्यात या निर्णयाची अंमलबजावणी 15 मार्चपासून करण्यात येणार आहे. या निर्णयानुसार प्रतिलिटर गायीच्या दुधाची विक्री 56 वरून 58 रुपये, तर म्हशीच्या दुधाची विक्री 72 वरून 74 रुपये

होणार आहे. अशी माहिती दूध उत्पादक आणि प्रक्रिया कल्याणकारी संघाचे अध्यक्ष गोपाळराव म्हस्के आणि मानद सचिव प्रकाश कुतवळ यांनी आज पुण्यात दिली.

**खत विक्री**

भारतीय खत सहकारी संस्था अर्थात 'इफ्को' च्या नॅनो खतांची विक्री ऑनलाइन पद्धतीनं कमी दराने बेकायदा होत असल्याचं कंपनीच्या निदर्शनास आलं आहे.
अशी ऑनलाइन विक्री करणाऱ्यांविरुद्ध 'इफ्को' कडून आता कायदेशीर कारवाई सुरु करण्यात आली आहे. शेतकऱ्यांनी 'इफ्को' ची खतं अधिकृत विक्रेत्यांकडूनच खरेदी करावीत, असं आवाहन पुणे 'इफ्को ' कडून करण्यात आलं आहे.

**राष्ट्रीय लोकअदालत**

पुणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरणामार्फत राष्ट्रीय लोकअदालतीचं आयोजन शनिवारी 22 मार्च ला जिल्ह्यातील प्रत्येक न्यायालयात करण्यात येणार आहे. अधिकाधिक पक्षकारांनी या राष्ट्रीय लोकअदालतीत सहभागी होऊन लाभ घेण्याचं आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष महेंद्र महाजन आणि सचिव सोनल पाटील यांनी केलं आहे.

**पिं चिं**

पिंपरी चिंचवड शहराच्या वाढत्या लोकसंख्येला 620 दशलक्ष लिटर पाणी कमी पडत आहे. त्यामुळे मुळशी धरणातून 760 दशलक्ष लिटर पाणी पिंपरी चिंचवड शहरासाठी आरक्षित करण्याची मागणी शहरातील लोकप्रतिनिधींनी महापालिका आयुक्त शेखर सिंह यांच्याकडे केली होती. याविषयीचा प्रस्ताव तयार करून आयुक्तांनी राज्याच्या जलसंपदा विभागाकडे पाठवला आहे.

**पिं चिं**

विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाची आवड निर्माण व्हावी, त्यांच्यातील वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित व्हावा, यासाठी पिंपरी चिंचवड महापालिकेच्या शिक्षण विभागाच्यावतीनं छत्रपती शिवाजी महाराज विद्यामंदिर इथं विज्ञान प्रदर्शनाचं आयोजन करण्यात आलं होतं. प्रदर्शनात पाचवी ते आठवीच्या विद्यार्थ्यांचे घनकचरा व्यवस्थापन, हवेचे वजन, भूकंप यासारख्या विषयांवरचे ९५ प्रकल्प होते.

**<u>हॉकी</u>**

हॉकी महाराष्ट्र आणि हॉकी इंडिया यांच्या पुढाकाराने राज्यस्तरीय अस्मिता हॉकी स्टेट हॉकी लीग स्पर्धा पिंपरी तील मेजर ध्यानचंद मैदानावर सुरू आहेत. स्पर्धेत मुलींच्या कनिष्ठ  गटात यजमान पुणे संघानं अहिल्यानगर संघाचा 15 -0 अशा मोठ्या फरकाने पराभव करत उपांत्य फेरीत प्रवेश केला. तनुश्री कडू हिनं चार तर सानिका माने हिनं तीन गोल करत संघाचा विजय साकार केला.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात आज कमाल तापमान 39 तर किमान तापमान 18 पूर्णांक 4 अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं.  उद्याही साधारण असंच तापमान राहण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविधभारती पुणे केंद्रावर संध्याकाळी 6 वाजता ताज्या पुणे वृत्तांत मध्ये, नमस्कार.**